**<u>वि. मु. नं.५०/२०१६ मधील नि.क्र.३४ वरील आदेश</u>**

प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादी क्र.1 यांनी त्यांच्याविरुध्द झालेला नो डब्ल्यु एस चा आदेश रदद होवून मिळून कैफियत दाखल करून घेणेकामी केलेला आहे. प्रतिवादींचे कथन की, त्यांना मुदतीत महसुल रेकॉर्ड व कागदपत्रे मिळाली नसल्याने मुदतीत कैफियत दाखल करता आली नाही. तसेच त्यांनी जाणुनबुजून कैफियत दाखल करण्यास उशिर केलेला नाही. सबब, अर्ज मंजुर करण्याची विनंती केली आहे.

२. वादींनी या अर्जास हरकत घेतली की, प्रतिवादींनी दाव्याचे कामकाज लांबणीवर टाकण्यासाठी जाणुन बुजून कैफियत देण्यास उशिर केलेला आहे. सबब, अर्ज रद्द करण्याची विनंती केली.

३. वादी व प्रतिवादींतर्फे युक्तिवाद ऐकला. अभिलेखाचे अवलोकन केले. सदरचा दावा हा जाहीर ठराव तसेच निरंतर मनाई हुकूमासाठी दाखल केलेला आहे. प्रस्तुत दाव्यात प्रतिवादी नं.1 हे दाव्यातील आवश्यक पक्षकार असुन दाव्याच्या अंतिम निकालासाठी त्यांचे म्हणणे ऐकणे योग्य राहील. सबब, न्यायाच्या दृष्टीने प्रस्तुतचा अर्ज मंजुर करणे आवश्यक आहे. सबब, खालील प्रमाणे आदेश पारित करण्यात येतो.

**<u>आदेश</u>**

सदरचा अर्ज खर्च रक्कम रू.१००/- सह मंजूर करण्यात येतो. खर्चाची रक्कम प्रतिवादींनी वादीस द्यावी.

सही/-
(के.पी.जैन देसरडा)
दि.२२/०४/२०१७
२ रे सह दिवाणी न्यायाधीश व.स्तर,
संगमनेर.